महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई 400 032.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३८२९ ई-मेल -rajesh.wadnerkar @nic.in

**क्रमांक :- यूआर २०२४/कौशल्य विकास युआर ११/का.४** **दिनांक : १६ सप्टेंबर, २०२४.**

**प्रति,**

प्रबंधक,
मुळ शाखा,
मुंबई उच्च न्यायालय,
मुंबई.

**विषय :- मा. लोक आयुक्त यांच्या शिफारशीनुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबईच्या सेवानिवृत्त न्यायाधिशांची नांवे पाठविण्याबाबत...**

**महोदय,**

श्री. ज.द. भुतांगे, तत्कालीन संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा. लोक आयुक्त यांच्याकडे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२ ते २०१३-१४ या आर्थिक वर्षात प्रशासकीय व वित्तीय अनियमितता करुन तसेच पुरवठादारांशी संगनमत करुन अंदाजे १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक शासकीय निधीच्या भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने सुरु असलेल्या चौकशीचा अद्याप निर्णय न झाल्याबद्दल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.२१.०६.२०२४ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. लोक आयुक्त यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील सेवानिवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात यावी तसेच सदर प्रकरण लाचलूचपत विभागाकडे संदर्भित करावे, अशी शिफारस केली आहे.

२. उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्यानुसार, मा. लोक आयुक्त यांच्या शिफारशीनुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१७-१८ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबईच्या सेवानिवृत्त न्यायाधिशांची नांवे तातडीने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागास उपलब्ध करुन देण्याकरिता उच्च न्यायालय प्रशासनाकडून सदर माहिती तातडीने **दि. २६ सप्टेंबर, २०२४** पर्यन्त या विभागास पाठविण्याची विनंती मा. उच्च न्यायालय प्रशासनास करण्यात येत आहे.

**आपला,**

**( राजेश सु. वडनेरकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**